The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्य आणि सामाजिक प्रबोधन

**प्रा.डॉ.परिमल अरविंद सुतवणे**
इतिहास विभाग प्रमुख , श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

मध्ययुगीन भारतामध्ये भक्ती पंथाची चळवळ ही मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाली. महाराष्ट्रामधे ही भक्ती पंथाची चळवळ यशस्वीपणे चालली. तत्कालीन समाजामध्ये निर्माण झालेली मरगळ दूर करणे, धार्मिक प्रबोधन करणे, अनिष्ट प्रथा नष्ट करणे, समाजाला एकत्र ठेवणे ,शुद्ध चारित्र्याची शिकवण देणे, राजकीय क्षेत्रातील अराजकतेबाबत जागृती निर्माण करणे याचबरोबर समाजातील सर्वच घटकांना घेऊन पुढे जाणे इत्यादी महत्त्वाची कार्ये या भक्ती चळवळीमधील सर्व संतांनी या काळात केली होती. संतांच्या मौलिक साहित्यातून मोठ्या प्रमाणावर समाजाचे प्रबोधन घडून आले. अभंग, किर्तन, भारुड, गाथा, चरित्रग्रंथ या सर्व माध्यमांमधून संतांनी आपले साहित्य आणि आपले विचार समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवले. संत साहित्यातून समाजात झालेल्या परिवर्तनाचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**1) धार्मिक पुनर्जागरण --**

धार्मिक क्षेत्रात जी काही अव्यवस्था त्याकाळात निर्माण झाली होती ती, संत साहित्यातील शिकावणुकीमुळे दूर झाला .भक्ति मार्गातील अवडंबरे ,अनिष्ट प्रथा इत्यादींना दूर करून निखळ ईश्वर भक्तीचा मार्ग या संत साहित्यातून पुढे आलेला दिसतो. मानसिक आणि सामाजिक शांतता मिळविण्यासाठी संत साहित्यातून आलेली तत्त्वे ही या काळातील जनसामान्यांसाठी उपयोगी ठरली. संत साहित्यातील कथा आणि मानवांची कर्तव्ये या विषयाबाबत विविध दाखले दिलेले दिसतात .व्यक्तीने धर्माचे आचरण करावे सचोटीने रहावे, वैचारिक शुद्धता स्वीकारून शुद्ध भक्तीचा अविष्कार करावा आणि धार्मिक चळवळ योग्य रीतीने पुढे चालवावी, असे प्रतिपादन संत साहित्यातून आलेले दिसते.

**2) शुद्ध चारित्र्यावर भर --**

तत्कालीन समाजामध्ये रूढ असलेल्या वाईट प्रथा, अनिष्ट रूढी , लोभ ,क्रोध, मोह, मत्सर या अवगुणांबद्दल संतांनी आपल्या साहित्यातून प्रबोधन केलेले दिसते. शुद्ध चारित्र्याची आवश्यकता, स्वतःच्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक आहे . आपण कसे निरोगी आणि उत्तम विचारांचे होऊन रहावे, याविषयी सुद्धा संत साहित्यातून सतत प्रतिपादन केलेले दिसते .समाजामध्ये आदर्श तत्वे प्रसारित करण्यासाठी संत साहित्याचा मोठा उपयोग झाला. वैयक्तिक आचरणामध्येही

सत्य बोलणे ,सदाचारी असणे, परोपकारी असणे, एकमेकांना सहकार्य करणे, अशी अनेक तत्वे संत साहित्यातून समाजाला प्राप्त झाली. संत साहित्यातून येणाऱ्या दाखल्यांवरून समाजामध्ये परिवर्तनाचे, विकासाचे विचार रुजले गेले आणि समाज पुढे जात राहिला.

**3) शेती आणि निसर्गाविषयीचे प्रबोधन --**

संत साहित्यातून निसर्गाविषयीचे उदात्त विचार व्यक्त झालेले दिसतात. शेती विषयीची आत्मियता, श्रमाचे महत्त्व, मानवी जीवनातील शेतीचे महत्व, नैसर्गिक साधन संपत्तीचे महत्त्व, पिकांची जपणूक, ऋतूंचे चक्र, शेतीचे महत्त्व, शेतीची मशागत ,पशुधनाचे मानवी जीवनातील महत्त्व इत्यादी बाबी संत साहित्यातून योग्यप्रकारे मानवी जीवनात रुजविण्यात आल्या .मानवी जीवनासाठी या सर्व बाबी किती महत्त्वाच्या आहेत आणि आनंददायी आहेत याविषयीची माहिती पण संत साहित्यातून व्यक्त झालेली दिसते .निसर्ग, नदी, विहीर, पाणी ,हवा, डोंगर, झाडे, वेली, आकाश, पाऊस इत्यादींविषयीची कृतज्ञतेची भावना आणि जाणीव संत साहित्यातून व्यक्त झालेली दिसते

**4 ) पर्यावरणाचे जतन--**

संत साहित्यातून पर्यावरणाची जपणूक करण्यासाठीची शिकवणही दिलेली दिसते वृक्ष, वेली, झाडे, फळे, फुले ,पाणी कंदमुळे ,पक्षी, वन्यप्राणी, पाळीव प्राणी इत्यादींविषयीचे उत्कृष्ट वर्णन संत साहित्यातून आलेले आहे. मानवी जीवनातील या सर्वांचे महत्त्व आणि उपयोग याविषयी प्रबोधन केलेले दिसते. वन्यजीवांचे रक्षण करणे ,पशुपक्ष्यांचे रक्षण करणे म्हणजेच इतर जीवांचा आदर करणे आणि यातून मानवी जीवन हे चांगले घडवणे अशा प्रकारची शिकवण संत साहित्यातून आलेली आहे .मानवी जीवन हे निसर्गावर अवलंबून आहे, निसर्गाच्या सानिध्यात आपण मनाला शांती आणि समाधान मिळावू शकतो असे प्रतिपादन संत साहित्यातून केलेले दिसते .मानवाच्या व्यक्तिमत्त्वावर देखील निसर्गातील विविध घटकांचा प्रभाव पडत असतो. पर्यावरणाच्या रक्षणातूनच आपण स्वतःची प्रगती करू शकतो ,हे संत साहित्यातून दर्शविलेली दिसते.

**5) सामाजिक एकोपा --**

संत साहित्यातून सामाजिक एकोपा निर्माण झालेला दिसतो .तत्कालीन समाजामध्ये विविध स्तरांचे लोक राहत होते .वेगवेगळ्या सामाजिक आणि आर्थिक घटकांचे लोक रहात होते.समाजात वेगवेगळे व्यावसायिक रहात होते. संत साहित्यातून आलेल्या उदात्त विचारांचा म्हणजेच एकता, समानता ,परस्पर सहकार्य, सहचर्य ,सर्वांचे कल्याण, मानवाच्या अंतर्मनाचे समाधान ,आदरभाव, कौटुंबिक स्वास्थ्य, सामाजिक ऐक्य इत्यादी सद्गुणांच्या आधारे सामाजिक एकोपा निर्माण झालेला दिसतो. समाजातील स्त्री, पुरुष, लहान मूल, वृद्ध अशा सर्व स्तरातील मानवांचे कल्याण आणि

शांततामय जीवन याचा पुरस्कार सतत संत साहित्यातून केलेला दिसतो. समाजातील सर्वांनीच सुखी समाधानी व्हावे यासाठी संत साहित्यातून वेळोवेळी उपदेश केलेला आपल्याला दिसतो.

**6) मराठी भाषेचे महत्त्व आणि उपयोग--**

महाराष्ट्रातील संतांनी मराठी भाषेचा उपयोग आपले साहित्य निर्माण करण्यासाठी केला .अभंग, भारुड, गाथा, ओव्या, संतकाव्य, श्लोक, चरित्रग्रंथ, उपदेशपर लिखाण इत्यादी रचना ह्या मराठी भाषेतून करण्यात आल्या. मध्ययुगीन महाराष्ट्रात मराठी भाषा ही बोलीभाषा होती. संत साहित्य हे मराठी भाषेतून निर्माण झाल्यामुळे मराठी भाषा ही समृद्ध झाली जास्तीत जास्त लोकांपर्यंत संत साहित्य पोहोंचले यामुळे प्रबोधनही घडून आले. एक जागृत आणि उदात्त अशा विचारांना सोबत घेऊन जाणारा समाज या काळामध्ये निर्माण झाला. मराठी भाषेच्या इतिहासामध्ये सुद्धा संत साहित्याचे मोठे योगदान आहे.

**7) नैतिक विचारांचा आविष्कार --**

संत साहित्यातील मौलिक विचार वाचून, ऐकून तत्कालीन समाजातील लोकांच्या मनामध्ये शुद्ध विचार रुजले ,यातून शुद्ध चारित्र्य निर्माण झाले. समाजातील वाईट प्रथा आणि कृत्ये कमी झाली. मनातील शुद्ध विचारांच्या बळावरच माणूस हा कुटुंबात, समाजात योग्य असे वर्तन करू शकतो आणि आपले योगदान देऊ शकतो हे या काळात दिसून आले. मानवतावादी विचारातून आपल्याबरोबरच इतरांनाही आपण चांगले जीवन जगण्यासाठी मदत केली पाहिजे असे विचार समाजात संत साहित्यातून रुजले. प्राणीमात्रावरील दया त्यांची काळजी घेणे असे योग्य वर्तन समाजामध्ये वाढीस लागले. संत साहित्यातून नैतिक विचार प्रसारित झाल्यामुळेच व्यक्ती ही आपल्या कर्तव्याप्रति कार्यप्रवण झाली. समाजातील सर्वांना या शुद्ध विचारांनी एकत्र आणले आणि सामाजिक एकात्मता निर्माण झाली.

- **संत साहित्यातील महत्त्वपूर्ण संकल्पना --**

मानवी जीवनामध्ये अतिशय उपयुक्त ठरलेल्या संत साहित्यातील विविध संकल्पनांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल

**1)** समाजामध्ये ईश्वर भक्ती ही सदोदित करावी हा विचार संत साहित्यातून समाजात रुजला.

**२)** संत साहित्यातून तत्कालीन समाजाचे मोठ्या प्रमाणावर लोकशिक्षणही झाले होते .समाजामध्ये जागृती निर्माण झाली होती.

**३)** संत साहित्यातून समाजामध्ये वास्तव्याला असलेल्या सर्वांचे भावनिक क्षेत्रामध्ये ही प्रबोधन झालेले दिसते. भावनिक उन्नती आणि कठीण प्रसंगी भावनेवर नियंत्रण ठेवून मार्ग कसा काढावा याचेही शिक्षण संत साहित्यातून मिळते.

**४)** व्यक्तीने आपल्या जीवनामध्ये जे काही अनुभवले आहे ,जे काही पाहिले आहे ,जे गुण आत्मसात केले आहेत त्या सर्वांपासून आणि अनुभवातून ज्ञान मिळविण्याची शिकवण संत साहित्यातून मिळते

**५)** संत साहित्यातून समाजामध्ये अध्यात्मिक उन्नतीसाठी ,मानसिक समाधानासाठी नामस्मरण, जप ,भक्ती आणि परोपकार इत्यादी संकल्पनांचा प्रचार झालेला दिसतो .या संकल्पनांना सर्वांनी आत्मसात करावे आणि त्याप्रमाणे वागावे अशी शिकवणही संत साहित्यातून मिळते.

उपरोक्त विवेचनाच्या आधारे आपणास असे म्हणता येते की ,संत साहित्यातून मध्ययुगीन काळामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रबोधन झाले. लोकशिक्षणाच्या माध्यमातून सर्वांपर्यंत ज्ञान पोहोंचले. समाज ,कुटुंब यांची प्रगती कशी साधावी ,वैयक्तिक जीवनामध्ये ही आपल्या संकटांवर कशी मात करावी, यासाठीचे मार्गदर्शन संत साहित्यातून केलेले दिसते. संत साहित्यातून त्या काळामध्ये व्यक्तीच्या शुद्ध चरित्र्यावर भर दिलेला दिसतो .व्यक्तीचे चारित्र्य जर शुद्ध असेल तर तो कुटुंबामध्ये आणि समाजामध्ये योग्य प्रकारे आपले योगदान देऊ शकतो असे संत साहित्य सांगते. त्याचबरोबर धार्मिक क्षेत्रातही पुनर्जागरण झालेले दिसते. कुठल्याही प्रकारच्या अनिष्ट प्रथांना थारा न देता, शुध्द ईश्र्वरभक्तीचा मार्ग अवलंबावा . यासाठी संत साहित्य उपयुक्त ठरते. पर्यावरण रक्षण ही आजच्या काळाची मोठी समस्या आहे . पर्यावरणाचे रक्षण कसे करावे. पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा निकटचा संबंध आहे आहे.अशा प्रकारची शिकवण संत साहित्यातून मिळते .शेती हा व्यवसाय किती प्रतिष्ठित आहे आणि शेती केल्याने आपल्याला समाधान मिळते, त्याचबरोबर शेतीतून आपल्याला अन्न मिळते. शेतीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या पशुधनाचाही आपण आदर केला पाहिजे ही शिकवणही संत साहित्यातून मिळते .मानवी जीवनाच्या कल्याणासाठी निसर्ग सुरक्षित ठेवावा. यामुळेच आमचे जीवन सुखी होते अशा प्रकारची शिकवणही संत साहित्यातून मिळते.मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये जे संत साहित्य निर्माण झाले ते प्रामुख्याने मराठी भाषेतून होते,म्हणून मराठी भाषा या काळात समृद्ध झाली .मराठी भाषा ही बोलीभाषा असल्यामुळे सर्वसामान्यांपर्यंत हे संत साहित्य पोहोंचले आणि समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर लोक जागृती घडून आली

**संदर्भ ग्रंथ :-**

1. पानसे मु.ग - यादवकालीन महाराष्ट्र
2. अ.रा. कुलकर्णी - मध्ययुगीन महाराष्ट्र
3. प्रा. डॉ. शुभांगना अत्रे, - महाराष्ट्र संस्कृती १८१८ पर्यंत
   प्रा. कल्पना रायरीकर सौमित्र कुंजळे
4. म. सु. पाटील -ज्ञानेश्वरीचा तृष्णाबंध
5. डॉ. बी एन पाटील - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास

**संत साहित्य आणि सामाजिक प्रबोधन**

**प्रा.डॉ.परिमल अरविंद सुतवणे**